This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No. / अनुक्रमांक | | | | | | | | | | | | |

Code No. 53/S/O/M
कोड नं.

Set - A

# MARATHI
## (मराठी)
## (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators 1. ____________________
(निरीक्षकाची सही)
2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निर्दशनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **53/S/O/M-A** लिहावेत.

# MARATHI

# (मराठी)

# (204)

वेळ : 3 तास] [एकूण गुण : **100**

**निर्देश :**

1. **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. **सर्व** प्रश्न लक्षपूर्वक वाचून मगच प्रश्नाचे उत्तर द्यावे.
3. प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

---

**1** झेल्याचे नाव काय होते ? **1**

(A) जमाल (B) जगदीश

(C) सदाशिव (D) जालंदर

**2** पुढे दिलेल्या पर्यांयांपैकी योग्य पर्याय ओळखा. **1**

(A) परीस्थिती (B) परिस्थिति

(C) परीस्थिति (D) परिस्थिती

**3** खालील काव्यपंक्तींल रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा ''प्रिय.......... गाऊ'' **1**

(A) मंगलगीते (B) निसर्गगीते

(C) बालगीते (D) भारतगीते

**4** पुढीलपैकी कुठल्या वाक्यात सर्वनाम आले आहे ? **1**

(A) श्याम उद्या येईल (B) राघव हुशार आहे

(C) मी पुस्तक वाचले (D) गायत्री सुंदर दिसते

5 वीर पत्नि पतीच्या भाळी कोणता तिलक लावणार आहे ? 1

(A) विजय तिलक
(B) कुंकुम तिलक
(C) शुभ तिलक
(D) तिलक

6 खालील वाक्यातील रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा. 1

सकळ लोक एक करावे । गलीम ........... काढावे.

(A) हुडकून
(B) उपटून
(C) उखडून
(D) निवटून

7 हनुमंताने कोणाला सुखी केले ? 1

(A) आईला
(B) रामाला
(C) सीतेला
(D) भावाला

8 पुढील वाक्याचा काळ ओळखा, पर्याय पुढे दिले आहेत 'ते काम करतात.' 1

(A) वर्तमानकाळ
(B) भविष्यकाळ
(C) भूतकाळ
(D) यापैकी कोणताही नाही

9 खालील पर्यायांमधील शुद्ध शब्द लिहा – 1

(A) वाटवून
(B) वाटुन
(C) वाटून
(D) वाटोन

10 लग्नापूर्वी नागू गवळ्याचा जास्त वेळ पुढील कोणत्या गोष्टीत जायचा ? 1

(A) दुध घालणे
(B) पेलवानी करण्यात
(C) झोप घेणे
(D) यापैकी काही नाही

11 योग्य वाकप्रचार अथवा म्हण वापरून वाक्य पूर्ण करा : 1

''नात्यातच लग्न झालेल्या मालतीला सासरी सारखा जाच सहन करावा लागत होता पण ती अगतिक झाली होती, माहेरी यातले काही सांगू शकत नव्हती, तिची अवस्था..... ''

(A) इकडे आड तिकडे विहीर (B) तोंड दाबून बुक्याचा भार

(C) कानामागून आली तिखट झाली (D) खडे फोडणे

12 मास्तरांच्या सहवासाने झेल्याच्या वर्तनात कोणता बदल झाला ? 1

13 भाषा विकासासाठी लो. टिळक तरूणांकडून कोणत्या अपेक्षा करतात ? 1

14 'हे कंकण करी बांधियले' असे कवीने कां म्हटले आहे ? (बलसागर भारत होवो) 1

15 आकाशात उडणाऱ्या बगळ्यांची रांग पाहून कवीच्या मनात कोणत्या कल्पना येतात ? 1

16 आचार्य विनोबाजींच्या मते देशाला चांगले नागरिक केव्हा मिळतील ? 1

17 नागूचे थोडक्यात व्यक्तिचित्र रेखाटा. 1

18 कवीने पिल्लाच्या दुःखाचे वर्णन कसे केले आहे ? (एका तथ्यात) 1

19 कवीला विद्येचा भार व्यर्थ कां वाटतो ? (सागरास) 1

20 कन्याकुमारीच्या समुद्रकिनारी लेखकाचा कंठ कां दाटून आला ? 1

21 शेतकरी कलेक्टर साहेबांकडे कशासाठी गेला होता ? 1

22 पुढे दिलेल्या शब्द समुहा बद्दल एक शब्द सूचवा – 1

(i) गुप्त बातम्या काढणारा

(ii) गुरे बांधन्याची जागा

23 (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन दोन समानार्थी शब्द लिहा :– 2

(i) नदी

(ii) चंद्र

(ब) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :– 2

(i) सुकाळ (ii) हिंसा

(iii) विश्वास (iv) सुर

24 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :

जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो. हा विचार सर्व संतमहंतांनी आणि विचारवंतांनी पुसून टाकायचा अखंड प्रयत्न केला आहे. संतांचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही. त्याला संतत्वाच्या आणि देवत्त्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही. ही विशाल व सर्व समावेशक दृष्टी संतांच्या साहित्यातून प्रयुट झाली आहे. ''भेदाभेद भ्रम अमंगळ'' आणि ''जे जे भेटे भूत ते ते जाणिचे भगवंत'' हा उद्दात्त विचार तर्कशुद्ध आहे. आपल्या खांद्यावर जातीय उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे, ते फेकून दिले पाहिजे. हे अनेक संतांनी गरजून सांगितले आहे. परोपरीने सांगितले आहे. पण माणसाचा मुर्दाडपणा अलौकिक आहे. संताच्या कपाळावर त्याने जातीवर्णाची लेबले तत्परतेने आणि धूर्तपणे चिकटवली. खरे तर साधूंचीच काय सामान्यांची जात माणूस असते, माणूसच असावी. माणसांची जाती वाढावी. मानव्याची उंची वाढत जावी हे संतांचे स्वप्न आहे. पण ते घडत नहीं, म्हणून संतांच्या वाणीला अनेक वेळा हुंदके फुटलेले आहेत.

**प्रश्न :**

(i) संतमहंतांनी कोणता प्रयत्न केला ? 1

(ii) संतसाहित्यातील उदात्त विचार कोणता ? 1

(iii) संतवाणीला हुंदके कां फुटले ? 1

(iv) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. 1

25 खालील काव्यांश लक्षपूर्वक वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :–

पिल्लात्रास दुःख भारी, भोळे रडे स्वतः शी
भावंड ना विचारी, सांगेल ते कुणाशी ?
जे ते तयास टोची, दावी उगाच धाक
आहे कुरूप वेडें पिल्लू तयात एक !
एके दिनी परंतु, पिल्लास त्या कळालें
भय वेड पार त्याचे वाऱ्यासवे पळालें
पाण्यात पाहताना चोरूनिया क्षर्णेक
त्याचेच त्या कळाले – तो राजहंस एक

**प्रश्न :**

(i) प्रत्येक जण पिल्लाशी कसा बोलत होता ? **1**

(ii) हे काव्य कुणी रचले आहे ? **1**

(iii) बदकाच्या उदाहरणातून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले आहेत ? स्वतःच्या शब्दात सांगा. **2**

26 (i) महान कार्य यशस्वी करण्यासाठी राजाने कसे वागले पाहिजे ? **2**

(ii) सृष्टीच्या निर्मितीच्या शक्तीचे कौतुक कवी कोणत्या शब्दांमध्ये सांगतो ? **2**

27 (अ) ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मके' हे विशेषण का व कुणासाठी वापरले आहे ? **3**

(ब) श्रीनिवास रामानुजन यांच्या विषयी माहिती द्या. **3**

28 (अ) ससंदर्भ अर्थ स्पष्ट करा – 2

"पहा टाकिले पुसुनि डोळे गिळला मी हुंदका,
खांगणी जा सुखे राजसा परतुनि पाहू नका"

(ब) लेखकाला (वि.स. खांडेकर) कोणत्या जुन्या गोष्टी जपून ठेवाव्यात असे वाटते ? 2

29 (अ) घरी आलेली बाई हिंदू किंवा ख्रिश्चन याचा अंदाज लक्ष्मीबाईंना कां आला नाही ? 3

(ब) हजारो वर्षांनंतर कोण कोणास लाभले ? कवितेचे व कवीचे नाव लिहा. 3

30 (अ) 'सागरास' कवितेचे कवी कोण ? या कवितेन कवी सागरास कोणते प्रश्न विचारतो ? व कां ? 3

(ब) संदर्भ देउन अर्थ स्पष्ट करा – 3

"उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा !
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा !"

31 (अ) भारतीय गणितज्ज्ञांनी जगाला दिलेली देणगी कोणती ? 3

(ब) 'महर्षी कर्वे हे एक अद्‌भूत चमत्कार होंते, असे प्र.के. अत्रे कां म्हणतात ?' 3

32 वऱ्याच दिवसांनी आजी व नातू भेटले. (यांच्यातील संवाद 8 ते 10 वाक्यात लिहा) 4

33 खालीलपैकी कोणत्याही विषयावर निबंध लिहा : (शब्द मर्यादा 200 शब्द) 10

(i) ग्रंथ हेच गुरू

(ii) अति तेथे माती

(iii) माझा दक्षिण भारतातील प्रवास

(iv) माझी आजी.

**34** तुम्हाला या पाठ्यपुस्तकातील सर्वात अधिक कोणता पाठ आवडला ? कां ? पाठाचे व लेखकांचे नाव लिहा. **4**

**35** तुमचा लहान भाऊ इयत्ता नववीत प्रथम क्रमांकाने पास झाला आहे, त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. **8**

**किंवा**

तुमच्या परिसरातील दिवे लागत नसल्याने अंधार असतो, रस्त्यावरील दिवे लावण्यासाठी नगरपालिकेस पत्राने कळवा.

**36** पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा व योग्य शीर्षक ही द्या. **4**

अभ्यासक्रमाचे अनेक विषय आहेत. परंतु व्यक्तिगत अभिरुचि नावाची गोष्ट असतेच। नाटक, सिनेमा, कथा, कादंबरी यापैकी कशाने कोणाला विरंगुळा मिळेल किंवा मनोरंजन होईल. हे कोणीही सांगू शकणार नाही. आपणास काय आवडेल हे ज्याचे त्याला कळू शकेल. त्यातूनही असे घडते की, जे वाट्याला येते ते आवडत नाही. आणि जे आवडते ते लाभत नाही. शेवटी इच्छा नसतांना जे पत्करावे लागते, तेच गोड करून घ्यावे लागते, आरोग्यासाठी आसने, व्यायाम, प्राणायाम, फिरणे, पोहणे असे अनेक मार्ग सुचविले जातात. या साठी आपले शरीर कशाला प्रतिसाद देते'ते आत्मपरीक्षणानेच कळू शकते. आपल्या सुखाचे आणि स्वास्थ्याचे घटक आपणच शोधायचे असतात.

**37** एका फळांच्या करंडीत 200 फळांपैकी 900 सफरचंदे 25 संत्री, 50 आंबे, 25 मोसंबी आहेत. ही माहिती वर्तुळालेख काढून त्यात दाखवा. **4**